भगवान बुद्धांची अग्रश्राविका

# महापजापती गोतमी

दीर्घकाळ भिक्षुणी बनून राहाणाऱ्यांत अग्र

**हिन्दी पुस्तकाचा मराठी अनुवाद**



विपश्यना विशोधन विन्यास

भगवान बुद्धांची अग्रश्राविका

# महापजापती गोतमी

(दीर्घकाळ भिक्षुणी बनून राहाणाऱ्यांत अग्र)

हिन्दी पुस्तकाचा मराठी अनुवाद

विपश्यना विशोधन विन्यास
धम्मगिरी, इगतपुरी

# महापजापती गोतमी

पुस्तक कोडः **M50**

© विपश्यना विशोधन विन्यास
सर्वाधिकार सुरक्षित

**मुखपृष्ठ चित्रः** ग्लोबल विपश्यना पगोडाच्या आर्ट गॅलरी मधून घेतले आहे.

प्रथम संस्करण : जानेवारी 2025

**मूल्यः ₹**
**Price: Rs.**

**ISBN** 978-81-7414-489-8

**प्रकाशकः**
**विपश्यना विशोधन विन्यास**
धम्मगिरी, इगतपुरी - 422403
जिल्हा- नाशिक, महाराष्ट्र
फोनः ०२५५३-२४४९९८, २४३५५३, २४४०७६,
२४४०८६, २४४१४४, २४४४४०
Email: vri_admin@vridhamma.org
Website: www.vridhamma.org

**मुद्रकः**
**अपोलो प्रिंटिंग प्रेस**
२५९, सीकॉफ लिमिटेड, ६९ एम. आय. डी. सी.,
सातपुर, नाशिक-४२२००७, महाराष्ट्र

## भगवान बुद्धांची उद्घोषणा

**“एतदग्गं, भिक्खवे, मम साविकानं भिक्खुनीनं रत्तञ्ञूनं यदिदं महापजापतिगोतमी।”**

*– अङ्गुत्तरनिकाय (१.१.२३५)*

“भिक्षूंनो! माझ्या दीर्घकालीन भिक्षुणी-श्राविकांमध्ये (दीर्घकाळ भिक्षुणी बनून राहणाऱ्यांत) अग्र आहे महापजापती गोतमी.”

# महापजापती गोतमी

# महापजापती गोतमी

## विषयानुक्रमणिका

**प्रकाशकीय ........................................................................ 7**

**महापजापती गोतमी ........................................................ 9**

वर्तमान कथा ................................................................ 9

**महापजापती गोतमीची प्रव्रज्या ........................................ 11**

महापजापती गोतमीची प्रव्रज्या ...................................... 11

गोतमीच्या उपसंपदेवर शंका – (१) ................................ 16

गोतमीच्या उपसंपदेवर शंका – (२) ................................ 17

**भगवानांद्वारे गोतमीला उपदेश ........................................ 18**

संक्षिप्त धर्मोपदेशासाठी प्रार्थना ...................................... 18

शिक्षापदांचे पालन ........................................................ 19

संघ-दक्षिणा अधिक फलदायी .......................................... 19

**भिक्षू-भिक्षुणींची शिक्षापदे ................................................ 23**

गोतमीची प्रार्थना .......................................................... 23

भिक्षुणींकडून वैयक्तिक सेवा घेण्यावर बंदी .................... 23

गोतमीसाठी शिक्षापदात दुरुस्ती .................................... 25

**महापजापती गोतमीद्वारे खरी वंदना ................................ 26**

**महापजापती गोतमीचे परिनिर्वाण ...................................... 32**

दाह-संस्कार ........................................................................ 33

गोतमीप्रति भगवानांचे उद्गार ........................................... 33

**अतीत कथा ................................................................ 35**

भगवान पदुमुत्तरांचा शासनकाळ .................................... 35

बुद्धांतर काळ ....................................................................... 35

**महापजापती गोतमीचे उद्गार ................................................ 38**

**विपश्यना साधना केंद्र ........................................................ 40**

# प्रकाशकीय

महामायाची धाकटी बहीण – महापजापती गोतमीचा विवाह महाराज शुद्धोदनशी झाला होता. सिद्धार्थ गौतमला जन्म दिल्याच्या सात दिवसांनंतर महामाया स्वर्गवासी झाली. त्यामुळे महापजापतीनेच सिद्धार्थचे पालन-पोषण केले.

सिद्धार्थवर त्यांचा अपार स्नेह होता. जेव्हा सिद्धार्थने गृहत्याग केला तेव्हा महापजापतीने आपले पती शुद्धोदन यांच्यासोबत खूप करुण विलाप केला.

घर सोडल्यानंतर प्रथमच सम्यक संबुद्धांच्या रूपात जेव्हा सिद्धार्थ गौतम कपिलवस्तुमध्ये आले तेव्हा त्यांनी नंद आणि राहुलला प्रव्रजित केले. काही वर्षानंतर जेव्हा ते अर्हंत झाले आणि महाराज शुद्धोदनांचेही परिनिर्वाण झाले तेव्हा महापजापतीने भगवान बुद्धांना आग्रह केला की त्यांनी तिला प्रव्रज्या द्यावी. परंतु भगवानांनी ते मान्य केले नाही. त्यांनी भिक्षुणीसंघ बनविला नाही.

कारण स्पष्ट होते. जेव्हा भिक्षुणींना प्रवास करावा लागेल तेव्हा त्यांच्या रक्षणासाठी काही भिक्षूंना सोबत जावे लागेल, जे अनुचित होईल. एखादी एकटी भिक्षुणी वनप्रदेशात तप करीत असेल तर गृहस्थ युवकावर स्वार होऊन मार तिला दूषित करण्याचा प्रयत्न करु शकतो, त्यात तो सफलही होऊ शकतो.

अशा कारणांमुळे भगवान भिक्षुणीसंघाची स्थापना करु इच्छित नव्हते. परंतु जेव्हा महापजापती डोक्याचे मुंडण करुन, पिवळे वस्त्र परिधान करुन, यशोधरेसह राजघराण्यातील ५०० स्त्रियांना याच वेषात आपल्या सोबत घेऊन, अनवाणी पायांनी चालत वैशालीच्या कूटागारशाळेमध्ये भगवानांकडे पोहोचली आणि रडत रडत त्या सर्वजणींना प्रव्रजित करण्याची प्रार्थना केली, तेव्हा आनंदच्या प्रबळ आग्रहामुळे भगवानांना स्वीकृती द्यावी लागली. त्यांच्यासाठी काही विशिष्ट नियमांचे पालन करणे अनिवार्य करुन त्यांना प्रव्रजित केले आणि भिक्षुणी संघाची स्थापना केली. महापजापतीने विपश्यना साधनेद्वारे थोड्याच दिवसात अरहंत अवस्था

प्राप्त केली. भगवानांनी तिला दीर्घकाळ भिक्षुणी बनून राहाणाऱ्यांमध्ये अग्रस्थानी ठेवले. महापजापतीने जीवनभर अगणित दुःखी स्त्रियांना प्रव्रजित करुन विपश्यना साधना शिकवून मुक्त केले.

वृद्धावस्थेत जेव्हा महापजापतीच्या परिनिर्वाणाची वेळ आली तेव्हा ती भगवानांना नमस्कार करण्यासाठी आली आणि त्यावेळी तिने हे हृदयस्पर्शी उद्गार प्रकट केले–

**अहं सुगत ते माता, त्वञ्च वीर पिता मम।**

हे सुगत, मी तुमची दूध पाजणारी माता आहे आणि तुम्ही मला सुखद सद्धर्मात जन्म देणारे माझे पिता आहात.

चीवर घेऊन नमस्कार करण्यासाठी आलेल्या महापजापती गोतमीला भगवानांनी जवळ बसलेल्या, ध्यान करणाऱ्या श्रावकांकडे इशारा करत म्हटले–

**आरद्धवीरिये पहित्तते, निच्चं दळ्हपरक्कमे।**
**समग्गे सावके पस्से, एसा बुद्धान वन्दना॥**

– या श्रावकांना पाहा. जे समग्ररूपाने पराक्रम करीत साधना करीत आहेत. हीच बुद्धांची खरी वंदना आहे.

एका दुसऱ्या प्रसंगात आपली बहीण महामायाप्रति प्रकट केलेले तिचे उद्गारसुद्धा अत्यंत हृदयस्पर्शी आहेत–

**बहूनं वत अत्था, माया जनयि गोतमं।**

– अनेकांच्या कल्याणासाठीच मायाने गौतमला जन्म दिला.

भगवान बुद्धांचे भिक्षू-श्रावक आणि भिक्षुणी-श्राविकांच्या जीवनातील प्रेरणादायी प्रसंग आम्हा सर्वांच्या प्रेरणेचे कारण बनोत ज्यामुळे विपश्यी साधक आणि साधिका त्यापासून प्रेरणा घेऊन आपल्या जीवनशैलीचे पुनरावलोकन करुन त्यात थोडीतरी सुधारणा घडवून आणू शकतील. या मंगल भावनेसह या पुस्तिकेचे प्रकाशन केले जात आहे.

*– विपश्यना विशोधन विन्यास*